महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कमांक २२चे कलम ३६ अन्वयेचा मनाई आदेश

---

१) भारत निवडणूक आयोग यांचेकडील दिनांक १५ /१०/२०२४ रोजीचे प्रेस नोटनुसार.
२) जा.क.वि.शा./ निवडणुक/मनाई आदेश/ ९ ७ /२०२४, दिनांक:-१५ /१०/२०२४

आदेश:-

ज्या अर्थी उपोद्घातातील अ.क. १ मधील अधिसूचनेनुसार भारत निवडणूक आयोगाने, विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ कार्यक्रम जाहीर केलेला असून दिनांक १५/१०/२०२४ रोजीपासून आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे. ठाणे शहर आयुक्तालयातील १४ विधानसभा मतदारसंघात दिनांक २०/११/२०२४ रोजी मतदान व दिनांक २३/११/२०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होणार आहे. निवडणूकीच्या अनुषंगाने ठाणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये १३४ - भिवंडी ग्रामीण, १३६ - भिवंडी पश्चिम, १३७ - भिवंडी पुर्व, १३८ - कल्याण पश्चिम, १३९ - मुरबाड, १४० - अंबरनाथ, १४१ -उल्हासनगर, १४२ - कल्याण पुर्व, १४३ - डोबिंवली, १४४ - कल्याण ग्रामीण, १४६ - ओवळा माजिवडा, १४७ - कोपरी पाचपाखाडी, १४८ - ठाणे, १४९ - मुंब्रा कळवा मतदार संघ असे एकूण १४ विधानसभा मतदारसंघ येतात.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ जाहीर झाल्याने विविध राजकीय पक्षांच्या प्रचार फेऱ्या, सभा मेळावे इ. कार्यक्रमांचे आयोजन होणार आहे.

आणि ज्याअर्थी, मतदान प्रक्रिया शांत, निर्भय व नि:पक्षपाती वातावरणात पार पाडावी याकरिता ठाणे पोलीस आयुक्तालय हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी ' मीना मकवाणा ' पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर आम्हास पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कमांक २२ चे कलम ३६ अन्वये प्रदान करण्यात आलेले अधिकार त्यांनी कार्यालयीन आदेश क.CP/SB/ORDERS/76(A)/2024, दिनांक ११/०३/२०२४ अन्वये प्रदान केल्याने त्या अधिकाराचा वापर करून ठाणे पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना खालील बाबतीत लेखी अगर तोंडी आदेश देण्याचे अधिकार प्राधिकृत करीत आहे.

१. रस्त्यावरून जाणाऱ्या जमावाचे अगर मिरवणुकीतील व्यक्तीचे वागणे अगर कृत्य याबाबत आदेश देणे.
२. ज्या मार्गाने मिरवणूक किंवा जमाव जाईल अगर जाणार नाही ती वेळ व मार्ग निश्चित करणे.
३. सार्वजनिक ठिकाणी अगर निवडणुक प्रचारासाठीचे कार्यक्रमाचे वेळी वापरण्यात येणाऱ्या ध्वनीपेक्षकाच्या ध्वनीची तीव्रता, वापराची विहीत वेळ यावर नियंत्रण करणे.
४. निवडणुकीचे प्रचाराच्या निमित्ताने जाहीर सभा, रॅली इ. कार्यक्रम घेण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ याबाबत नियंत्रण करणे.

मी सुचना देते की, सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी सदरहू आदेशाच्या प्रती त्यांचे हद्दीत सहज दिसणाऱ्या सार्वजनिक ठिकाणी चिटकवून तसेच ध्वनीपेक्षकाद्वारे प्रक्षेपीत करून जाहीर कराव्या व तशा पोलीस ठाणे दैनंदिनीमध्ये नोंदी घ्याव्यात.

सदरचा आदेश ठाणे पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशन हद्दीत दिनांक १५/१०/२०२४ रोजी १५:३० वा.पासून ते दिनांक २३/११/२०२४ पर्यंत २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर आदेशाचा भंग करणारी व्यक्ती महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ कलम १३४ प्रमाणे कायदेशीर कारवाईस पात्र राहील. सदरचा आदेश दिनांक १५/१०/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्याने दिला आहे..

दिनांक :- १५/१०/२०२४

शिक्का

पोलीस उप आयुक्त विशेष शाखा, ठाणे शहर

(मीना मकवाणा) 15/10/24
पोलीस उप आयुक्त,
विशेष शाखा, ठाणे शहर